*Annexure XVII (4), (Vide Article - 17.03)*

पत्र
--

तातडीचे
-------

क्र. एफसीटी-१५८१/९३५४४-फ-१.
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक ४ मे १९८१.

प्रति,

मुख्य वनसंरक्षक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :- जंगल तोडीची कंत्राटी पध्दत बंद करणे.

दिनांक २५-३-१९८१ रोजी अंदाजपत्रकामधील वन विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना माननीय वन मंत्र्यांनी विधानसभागृहात अशी घोषणा केली की जुलै १९८१ पासून जंगल कटाईची कंत्राटी पध्दत बंद करण्यात येईल व जंगल कटाईची सर्व कामे वन विभागातर्फे [अथवा जंगल कामगार सहकारी संस्था मार्फत] करण्यात येतील. वरील आश्वासनाची पूर्ती करण्याच्या हेतूने जुलै १९८१ पासून अपवादात्मक प्रकरणे वगळता जंगल कुपांची विक्री थांबविण्यात यावी व जेव्हा "अपवादात्मक प्रकरण" म्हणून जंगल कुपांची विक्री करावयाचे असेल तेव्हा शासनाची पूर्व परवानगी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे जुलै १९८१ पासून जंगल तोडीची सर्व कामे जंगल कामगार सहकारी संस्था अथवा वन विभागा-मार्फत करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
[ग.गो.पेंदारकर]
उप सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन वि.

प्रतिलिपी रवाना :-

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, नागपूर

सर्व वनसंरक्षक,

महाराष्ट्र वन विकास महामंडळाचे सर्व प्रादेशिक व्यवस्थापक,

सर्व विभागीय वन अधिकारी व स्वतंत्र उप विभागांचे
उपविभागीय वन अधिकारी.

वित्त विभाग [इएक्सपी १०]

कार्यासन फ-२/फ-३/फ-५/फ-६ महसूल व वन विभाग.

फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग [सिलेक्ट फाईल]